# प्रेस नोट

## पुण्याच्या रिंगरोडसह मेट्रोच्या कामांना गती द्या; उपमुख्यमंत्र्यांचे 'पीएमआरडीए'ला निर्देश!

### मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात 'पीएमआरडीए'च्या कामकाजाचा घेतला आढावा

मुंबई : पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या विविध विकास प्रकल्पांना गती देऊन सर्व कामे विहित मुदतीत पूर्ण करा, असे निर्देश राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी 'पीएमआरडीए'ला दिले. पुण्याच्या वेगाने वाढणाऱ्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर रिंगरोड, मेट्रो, रस्ते विकास आणि नागरी पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना विशेष प्राधान्य देण्याची सूचना त्यांनी केली.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात आयोजित 'पीएमआरडीए'च्या विविध विभागांच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. या प्रसंगी उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, उपसचिव विनायक चव्हाण, सहसचिव डॉ. नवनाथ जरे, नगरविकास विभागाचे अवर सचिव अजयसिंह पाटील व शिवाजी चव्हाण, महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्यासह प्राधिकरणाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत महाराष्ट्रातील पहिल्या 'स्ट्रक्चरल प्लॅन'बाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले. तसेच, पुणे महापालिका हद्दीत गेलेल्या नगररचना योजना (टीपी स्कीम) पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरित केल्याची माहिती महानगर आयुक्तांनी दिली. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत ६ ते ७ महत्त्वाच्या प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. लवकरच हे प्रकल्प पूर्णत्वास जातील, असेही महानगर आयुक्तांनी सांगितले.

पीएमआरडीएने केवळ ९५ दिवसांत सेक्टर १२ येथे इमारत उभारण्याचा विक्रम केल्याबद्दल, तसेच पीएमआरडीएच्या आपत्ती प्रतिसाद दलाच्या (पीडीआरएफ) कार्याबद्दल उपमुख्यमंत्र्यांनी विशेष प्रशंसा केली. मावळ तालुक्यात ६ व ७ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीदरम्यान पीडीआरएफने केलेल्या मदत व बचाव कार्याबद्दलही उपमुख्यमंत्र्यांनी पीडीआरएफचे विशेष कौतुक केले. माण-हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो लाईन-३ प्रकल्पातील माण ते बालेवाडी (१३.२० किमी) टप्प्याला 'सीएमआरएस'कडून मान्यता मिळाली असून, ही सेवा लवकरच सुरू होणार आहे. तसेच, एचसीएमटीआर आणि इनर रिंगरोड यांसारख्या मोठ्या प्रकल्पांसाठी 'स्पेशल पर्पज व्हेईकल' (एसपीव्ही) स्थापन करून काम सुरू करण्यात येत आहे. चाकण, हिंजवडी आणि इनर रिंगरोडची भूसंपादन प्रक्रिया सध्या सुरू असून, ती 'फास्ट ट्रॅक'वर आणण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी या बैठकीत दिले.

पाषाण रॅम्पचे कामही डिसेंबरपर्यंत सुरू करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती महानगर आयुक्तांनी दिली. लोणावळा येथील टायगर व लायन्स पॉईंट परिसरातील 'ग्लास स्कायवॉक' प्रकल्पांतर्गत रस्ते, पार्किंग, स्वच्छतागृहे आणि पाणी व्यवस्थापन आदी कामे सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर करण्याचे नियोजन आहे. यासाठी 'आरएफपी' अंतिम टप्प्यात आहे. हा महत्त्वाचा प्रकल्प असल्याने उपमुख्यमंत्र्यांनी याबद्दल उत्सुकतेने माहिती घेतली आणि, "पर्यटनाच्या अनुषंगाने हा अत्यंत फायदेशीर प्रकल्प ठरेल," असा विश्वास व्यक्त केला.

इंद्रायणी, पवना आणि मुळा-मुठा या तिन्ही नद्यांचे संवर्धन प्रकल्प अतिशय महत्त्वाचे असून, खूप दिवसांपासून प्रलंबित असलेली ही कामे तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी दिले. मलनिस्सारण योजनांसाठी (एसटीपी) ग्रामपंचायतींकडून ठराव करून घेण्याचे प्राधिकरणाचे पाऊल योग्य असल्याचे त्या म्हणाल्या. पुणे

आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि कन्व्हेन्शन सेंटर (पीआयईसीसी) हा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झाला पाहिजे. हे केंद्र पीएमआरडीएचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रदर्शन केंद्र बनवण्याचे ध्येय असून, येथे जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यासाठी लवकरात लवकर प्रक्रिया सुरू करण्याची सूचना देण्यात आली. तसेच, सेक्टर १२ आणि सेक्टर ३ मधील 'स्पोर्ट्स टर्फ'चे प्रकल्प उत्तम संस्थांना चालवायला द्यावेत, असेही सांगण्यात आले. पीएमआरडीएतर्फे उभारण्यात येत असलेल्या भारतातील पहिल्या 'पोक्सो (POCSO) कोर्टा'चे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

या बैठकीचा समारोप करताना सुनेत्रा पवार म्हणाल्या, "पुणे शहराचा आणि लगतच्या ग्रामीण भागाचा विकास संतुलित राखण्यासाठी इथून पुढे मी पीएमआरडीएच्या सर्वच प्रकल्पांचा नियमितपणे स्वतः आढावा घेणार आहे. प्रलंबित विषय तातडीने मार्गी लावण्यासाठी शासन स्तरावर सर्वतोपरी प्रयत्न केले जातील."
----

पुण्याच्या भविष्यासाठी पीएमआरडीएचा मास्टर प्लॅन गतिमान करा!

पुणे जिल्ह्याच्या नियोजित आणि सर्वांगीण विकासात पीएमआरडीएची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पीएमआरडीएच्या कार्यक्षेत्रातील ६७४ गावे आणि सुमारे ५,२१५ चौ.कि.मी. क्षेत्राचा वाढता विस्तार, लोकसंख्या, औद्योगिकीकरण, नागरीकरण आणि पर्यटनाच्या संधी लक्षात घेऊन पुढील अनेक वर्षांचा विचार करून पायाभूत सुविधांचे नियोजन करण्याचे निर्देश दिले. पुणे इनर रिंग रोड, सीएमपीअंतर्गत प्रस्तावित प्रकल्प, हिंगणगाव पूल आणि यवत रेल्वे ब्रिजसह विविध प्रकल्पांना गती देण्याच्या सूचना दिल्या. पुणे शहर आणि पीएमआरडीए क्षेत्रातील वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी मल्टिमोडल हब, औद्योगिक, धार्मिक आणि पर्यटन कनेक्टिव्हिटी, तसेच विमानतळाशी जोडणीचा एकात्मिक विचार करण्यास सांगितले. माण–हिंजवडी परिसरातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता माण–हिंजवडी–शिवाजीनगर पुणे मेट्रो लाईन-३चे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. २३ स्थानकांच्या या मार्गिकेतील १२ स्थानकांचे काम पूर्ण झाले असून, आणखी ५ स्थानकांचे काम अंतिम टप्प्यात आहे. उर्वरित कामांना गती देऊन हा प्रकल्प नागरिकांच्या सेवेत लवकर आणण्यासाठी समन्वयाने काम करण्यास सांगितले. इंद्रायणी, पवना, मुळा आणि मुठा नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठीचे प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या. केवळ प्रकल्प उभारणे पुरेसे नसून, संबंधित यंत्रणा आणि संस्था स्वयंपूर्ण व आर्थिकदृष्ट्या शाश्वत असतील, तसेच भविष्यातील देखभाल-दुरुस्ती आणि संचालनाचा खर्च सक्षमपणे भागवता येईल, अशा पद्धतीने प्रकल्पांचे नियोजन करण्यावर भर दिला. तसेच, पीएमआरडीए क्षेत्रातील वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील नागरी विस्तार लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचे दीर्घकालीन नियोजन आतापासूनच करण्याच्या सूचना दिल्या. नवीन नागरी वसाहती, औद्योगिक क्षेत्रे, पर्यटनस्थळे आणि वाढणाऱ्या लोकसंख्येची गरज लक्षात घेऊन उपलब्ध जलस्रोत, वितरण व्यवस्था आणि भविष्यातील पाण्याची आवश्यकता यांचा एकत्रित विचार करण्यास सांगितले.

---

पुरुषोत्तम सांगळे, माहिती व जनसंपर्क अधिकारी, पीएमआरडीए